RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ८, अंक १०४] बुधवार, ऑगस्ट ३, २०२२/श्रावण १२, शके १९४४ [पृष्ठे ७, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २७३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ ऑगस्ट २०२२

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक एआरपी-२०२२/प्र.क्र.११५/तांशि-४.——ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) व (२) तसेच कलम २ च्या खंड (द) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून काढलेली शासकीय अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक टीईएम-२०२०/प्र.क्र.७१/तांशि-४, दिनांक ८ ऑक्टोबर २०२० (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा केला आहे), या अन्वये उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी यात विनिर्दिष्ट केलेले, व्यावसायिक शिक्षण पाठ्यक्रम म्हणून व्यावसायिक शिक्षण पदवीपूर्व पाठ्यक्रम आणि व्यावसायिक शिक्षण पदव्युत्तर पाठ्यक्रम, आणि त्यांच्या प्रवेशाच्या पात्रतेच्या शर्ती व आवश्यकता अधिसूचित केलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने, तिच्या मान्यता प्रक्रियेच्या हस्तपुस्तिका, २०२२-२३ मध्ये अभियांत्रिकी, नियोजन, अभिकल्प या पदवीपूर्व पाठ्यक्रमांच्या आणि व्यवस्थापन शास्त्र व संगणक उपयोजन यांमधील पदव्युत्तर पाठ्यक्रमांच्या प्रवेशाच्या पात्रतेच्या शर्ती व आवश्यकता यांमध्ये काही बदल केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, वास्तुशास्त्र परिषदेने तिच्या अधिसूचना एफ क्रमांक सी.ए./४३१ /२०२२/एम. एस.ए.इ. (विनियम), दिनांक ३० जून २०२२ अन्वये वास्तुशास्त्र परिषद (वास्तुशास्त्र शिक्षणाची किमान मानके) विनियम, २०२० मध्ये सुधारणा केली आहे ;

आणि ज्याअर्थी, वर नमूद केलेल्या व्यावसायिक शिक्षण पाठ्यक्रमाच्या प्रवेशाच्या पात्रता शर्ती व आवश्यकता यांमधील उक्त फेरबदल विचारात घेता, महाराष्ट्र शासनास, उक्त अधिसूचनेत सुधारणा करणे इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) व (२) तसेच कलम २ च्या खंड (द) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिसूचनेत पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :-

(१) उक्त अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूची - क मधील,-(क) स्तंभ (३) मधील पदवीपूर्व वास्तुशास्त्र पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ३ येथील नोंदीमध्ये,—

(एक) शैक्षणिक वर्ष, २०२२-२०२३ याकरिता, खंड (१) मधील उप-खंड (दोन) व (तीन) याऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येतील :—

" (दोन) उमेदवार, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित या विषयांसह परीक्षेच्या १०+२ आकृतीबंधाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण असावा ; किंवा

(दोन) उमेदवार, गणित या अनिवार्य विषयासह १०+२ पदविका परीक्षा उत्तीर्ण असावा ; किंवा

(तीन) उमेदवाराने, एकतर एनटीएने आयोजित केलेल्या (म्हणजेच जेईई) किंवा वास्तुशास्त्र परिषदेने आयोजित केलेल्या वास्तुशास्त्रामधील अभियोग्यता चाचणी (एनएटीए) मध्ये अर्हता प्राप्त करणे गरजेचे आहे ; ” ;

(दोन) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ याकरिता, खंड (२) मधील उप-खंड (एक) व (दोन) याऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येतील :—

“ (एक) उमेदवार, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित या विषयांसह परीक्षेच्या १०+२ आकृतीबंधाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण असावा ; किंवा

(एक) उमेदवार, गणित या अनिवार्य विषयासह १०+३ पदविका परीक्षा उत्तीर्ण असावा ; किंवा

(दोन) उमेदवाराने, एकतर एनटीएने आयोजित केलेल्या (म्हणजेच जेईई) किंवा वास्तुशास्त्र परिषदेने आयोजित केलेल्या वास्तुशास्त्रामधील अभियोग्यता चाचणी (एनएटीए) मध्ये अर्हता प्राप्त करणे गरजेचे आहे ;”

(ख) स्तंभ (३) मध्ये, पदवीपूर्व नियोजन पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ४ येथील नोंदीकरिता,—

(एक) खंड (१) मधील उप-खंड (दोन) याऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

(दोन) उमेदवाराने, गणित या अनिवार्य विषयासह भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र किंवा संगणक विज्ञान किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती तंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा माहिती पद्धती (इन्फॉर्मेटीक्स प्रॅक्टिसेस) किंवा जैवतंत्रज्ञान किंवा तांत्रिक व्यवसाय विषय अथवा कृषी किंवा अभियांत्रिकी रेखांकन (इंजिनिअरिंग ग्राफिक्स) किंवा व्यवसाय अभ्यास (बिजनेस स्टडीज) किंवा उद्योजकता या विषयांपैकी दोन विषय घेऊन १०+२ परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यामध्ये एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील राखीव प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत ;

(दोन) खंड (२) मधील, उप-खंड (दोन) या ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

“ (दोन) उमेदवाराने, गणित या अनिवार्य विषयासह भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र किंवा संगणक विज्ञान किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती तंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा माहिती पद्धती (इन्फॉर्मेटीक्स प्रॅक्टिसेस) किंवा जैवतंत्रज्ञान किंवा तांत्रिक व्यवसाय विषय अथवा कृषी किंवा अभियांत्रिकी रेखांकन (इंजिनिअरिंग ग्राफिक्स) किंवा व्यवसाय अभ्यास (बिजनेस स्टडीज) किंवा उद्योजकता या विषयांपैकी दोन विषय घेऊन १०+२ परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यामध्ये एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील राखीव प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत ;

(तीन) खंड (३) मधील, उप-खंड (एक) या ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

“ (एक) उमेदवाराने, गणित या अनिवार्य विषयासह भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र किंवा संगणक विज्ञान किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती तंत्रज्ञान किंवा जीवशास्त्र किंवा माहिती पद्धती (इन्फॉर्मेटीक्स प्रॅक्टिसेस) किंवा जैवतंत्रज्ञान किंवा तांत्रिक व्यवसाय अथवा कृषी किंवा अभियांत्रिकी रेखांकन (इंजिनिअरिंग ग्राफिक्स) किंवा व्यवसाय अभ्यास (बिजनेस स्टडीज) किंवा उद्योजकता या विषयांपैकी दोन विषय घेऊन १०+२ परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यामध्ये एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुण मिळवलेले असावेत ; ”

(ग) अभिकल्प पदवीपूर्व पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ८ येथील नोंदी ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

| | | |
|---|---|---|
| “ ८. | अभिकल्प पदवीपूर्व पाठ्यक्रम (बॅचलर ऑफ डिझाईन). | (क) प्रथम वर्ष प्रवेश –<br>(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार, अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार, जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेश व लडाख केंद्रशासित प्रदेश यांमधील स्थलांतरित उमेदवारी असलेले उमेदवार.—<br>(एक) उमेदवार, भारतीय नागरिक असला पाहिजे ;<br>(दोन) उमेदवाराने, १०+२आकृतीबंधाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील राखीव प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत किमान ४० टक्के गुण) मिळवलेले असावेत आणि सक्षम प्राधिकरणाने आयोजित केलेल्या सामायिक प्रवेश परीक्षेमध्ये (सीईटी) नॉन झिरो प्राप्तांक मिळविलेला असला पाहिजे.<br>(२) अनिवासी भारतीय/ भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती/भारतीय वंशाच्या व्यक्तींची व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक उमेदवारी असलेले उमेदवार.—<br>(एक) उमेदवाराने, १०+२ आकृतीबंधाची अंतिम परीक्षा, एकत्रित मिळून किमान ४५ टक्के गुणांनी उत्तीर्ण केलेली असावी ;<br>(दोन) समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेला इतर कोणताही निकष.” |

(२) अनुसूची-ख मध्ये,—

(क) स्तंभ (३) मधील, पदव्युत्तर पदवी व्यवस्थापन शास्त्राशी (एमबीए/एमएमएस) संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक १ येथील नोंदीमधील खंड (२) मधील उप-खंड (तीन) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (तीन) उमेदवारांनी पुढीलपैकी कोणत्याही एका परीक्षेमध्ये नॉन-झिरो पॉझिटिव्ह प्राप्तांक मिळविलेला असावा:-

सक्षम प्राधिकरणाने आयोजित केलेली सामायिक प्रवेश चाचणी किंवा भारतीय व्यवस्थापन संस्थेने आयोजित केलेली सामाईक प्रवेश चाचणी (CAT) किंवा राष्ट्रीय चाचणी अभिकरणाने आयोजित केलेली सामाईक व्यवस्थापन अभियोग्यता चाचणी (CMAT) किंवा झेवियर स्कूल ऑफ मॅनेजमेंट, जमशेदपूर यांनी आयोजित केलेली झेवियर अभियोग्यता चाचणी (XAT) किंवा भारतीय व्यवस्थापन प्रशाळा संघाने आयोजित केलेली व्यवस्थापन प्रवेशाकरिता प्रवेश चाचणी (ATMA) किंवा अखिल भारतीय व्यवस्थापन संस्थेने आयोजित केलेली व्यवस्थापन अभियोग्यता चाचणी (MAT) किंवा पदवी व्यवस्थापन प्रवेश परिषद युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका यांनी आयोजित केलेली पदवी व्यवस्थापन अभियोग्यता चाचणी (GMAT), " ;

(ख) पदव्युत्तर पदवी संगणक उपयोजनाशी [मास्टर ऑफ कॉम्प्युटर एप्लीकेशन (MCA)] संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक २ येथील नोंदीऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

| | | |
|---|---|---|
| " २. | संगणक उपयोजनेमधील पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम (मास्टर ऑफ कॉम्प्युटर एप्लीकेशन (MCA) | (१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार, अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार, जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेश व लडाख केंद्रशासित प्रदेश यांमधील स्थलांतरित उमेदवारी असलेले उमेदवार.—<br>(एक) उमेदवार, भारतीय नागरिक असला पाहिजे ;<br>(दोन) उमेदवार, बी.सी.ए. किंवा बी.एससी (संगणक विज्ञान) किंवा बी.एससी (माहिती व तंत्रज्ञान) किंवा अभियांत्रिकी पदवी (बी.ई) (सी.एस.ई.) किंवा बी.टेक (सी.एस.ई) किंवा बी.ई. (माहिती व तंत्रज्ञान) किंवा बी. टेक (माहिती व तंत्रज्ञान) किंवा समतुल्य पदवी उत्तीर्ण केलेली असावी आणि एकत्रित मिळून किमान ५० टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील राखीव प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४५ टक्के गुण) मिळवलेले असावेत ; किंवा<br>(दोन) उमेदवाराने, प्राधान्याने १०+२ स्तरावरील किंवा पदवी स्तरावरील गणित विषयासह कोणतीही स्नातक पदवी (उदा. बी.ई. किंवा बी.टेक किंवा बी.एससी किंवा बी.कॉम किंवा बी.ए किंवा बी.व्होकेशनल, इत्यादी) उत्तीर्ण केलेली असावी आणि एकत्रित मिळून किमान ५० टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील राखीव प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आणि दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, किमान ४५ टक्के गुण) मिळवलेले असावेत ;<br>(तीन) उमेदवाराने, सामायिक प्रवेश चाचणीमध्ये नॉन-झिरो पॉझिटिव्ह प्राप्तांक मिळविला असावा.<br>(२) अनिवासी भारतीय/ भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती /भारतीय वंशाच्या व्यक्ती व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक उमेदवारी असलेले उमेदवार.—<br>(एक) उमेदवार, बी.सी.ए. (बॅचलर ऑफ कॉम्प्युटर एप्लीकेशन) किंवा बी.एससी (संगणक विज्ञान) किंवा बी.एससी (माहिती व तंत्रज्ञान) किंवा बी.ई. (सी.एस.ई.) किंवा बी.टेक (सी.एस.ई), किंवा बी. ई. (माहिती व तंत्रज्ञान) किंवा बी. टेक. (माहिती व तंत्रज्ञान) किंवा समतुल्य स्नातक पदवी, एकत्रित मिळून किमान ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण केलेली असावी ; किंवा<br>(एक) उमेदवाराने, प्राधान्याने १०+२ स्तरावरील किंवा पदवी स्तरावरील गणित विषयासह कोणतीही स्नातक पदवी (उदा.बी.ई. किंवा बी.टेक किंवा बी.एससी किंवा बी.कॉम किंवा बी.ए किंवा बी.व्होकेशनल, इत्यादी) उत्तीर्ण केलेली असावी आणि एकत्रित मिळून किमान ५० टक्के गुण मिळवलेले असावेत ;<br>(दोन) अधिनियमान्वये व्याख्या केल्याप्रमाणे समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेला इतर कोणताही निकष. " |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतिश तिडके,**
शासनाचे उप सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 3rd August 2022

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION of ADMISSIONS and FEES) ACT, 2015.

No. ARP-2022/C.R.115/TE 4.—Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Higher and Technical Education Department, No.TEM-2020/C.R.71/TE-4, dated the 8th October 2020 (hereinafter referred to as " the said Notification "), issued in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3 read with clause (*r*) of section 2 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015), notified the Professional Education Under Graduate Courses and Professional Education Post Graduate Courses Specified Herein to be the Professional Education for the purposes of the said Act, and the eligibility conditions and requirements for admissions thereto ;

And whereas, All India Council for Technical Education in its Approval Process Handbook 2022-2023, has made certain modifications in eligibility conditions and requirements for admission to Under Graduate Courses in Engineering, Planning, Design and Post Graduate Courses in Management and Computer Applications ;

And whereas, Council of Architecture has *vide* its notification F.No.CA/431/2022/ MSAE(Regulations), dated 30th June 2022, amended the Council of Architecture (Minimum Standards of Architectural Education) Regulations, 2020 ;

And whereas, in view of the said modifications in the eligibility conditions and requirements for admission to the above mentioned professional courses the Government of Maharashtra considers it expedient to amend the said Notification ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3 read with clause (*r*) of section 2 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015, the Government of Maharashtra hereby amends the said Notification, as follows, namely :—

(1) In the Schedule A,- the said Notification,—

(a) in entry at serial No.3 relating to Under Graduate Course in Architecture, in column (3),—

(*i*) in clause (*1*), for the sub-clause (*ii*) and (*iii*) the following sub-clauses shall be substituted for the academic year 2022-2023, namely :—"

(*ii*) The candidate should have passed an examination at the end of the 10+2 scheme of examination with Physics, Chemistry and Mathematics subjects ; or

(*ii*) The candidate should have passed 10+3 Diploma Examination with Mathematics as compulsory subject ;

(*iii*) The candidate needs to qualify an aptitude test in architecture conducted either by NTA (*i.e.*JEE) or NATA conducted by the Council of Architecture ; "

(*ii*) in clause (*2*), for the sub-clause (*i*) and (*ii*) the following sub-clauses shall be substituted for the academic year 2022-2023, namely :—

" (*i*) The candidate should have passed an examination at the end of the 10+2 scheme of examination with Physics, Chemistry and Mathematics subjects ; or

(*i*) The candidate should have passed 10+3 Diploma Examination with Mathematics as compulsory subject ;

(*ii*) The candidate needs to qualify an aptitude test in architecture conducted either by NTA (*i.e.*JEE) or NATA conducted by the Council of Architecture ; " ;

(*b*) for entry at serial No.4, relating to Under Graduate Course in Planning in column (*3*),

(*i*) in clause (*1*), for sub-clause (*ii*), the following sub-clause shall be substituted, namely :—

" (*ii*) The candidate should have passed 10+2 examination with Mathematics as compulsory subject along with any two subjects out of Physics or Chemistry or Computer Science or Electronics or Information Technology or Biology or Informatics Practices or Biotechnology or Technical Vocational subject or Agriculture or Engineering Graphics or Business Studies or Entrepreneurship and obtained at least 45 % marks in aggregate (at least 40 % marks in aggregate in case of Reserved categories, Economically Weaker Section and Persons with Disability category candidates belonging to Maharashtra State) ; "

(*ii*) in clause (*2*), for sub-clause (*ii*) the following sub-clause shall be substituted, namely :—

" (*ii*) The candidate should have passed 10+2 examination with Mathematics as compulsory subject along with any two subjects out of Physics or Chemistry or Computer Science or Electronics or Information Technology or Biology or Informatics Practices or Biotechnology or Technical Vocational subject or Agriculture or Engineering Graphics or Business Studies or Entrepreneurship and obtained at least 45 % marks in aggregate (at least 40 % marks in aggregate in case of Reserved categories, Economically Weaker Section and Persons with Disability category candidates belonging to Maharashtra State) ; "

(*iii*) in clause (*3*), for the sub-clause (*i*) the following sub-clause shall be substituted, namely :—

" (*i*) The candidate should have passed 10+2 examination with Mathematics as compulsory subject along with any two subjects out of Physics or Chemistry or Computer Science or Electronics or Information Technology or Biology or Informatics Practices or Biotechnology or Technical Vocational subject or Agriculture or Engineering Graphics or Business Studies or Entrepreneurship and obtained at least 45% marks in aggregate ; " ;

(*c*) for entry at serial No.8, relating to Under Graduate Course in Design, the following entry shall be substituted, namely : —

| | | |
|---|---|---|
| " 8. | Undergraduate Course in Design (Bachelor of Design) | (A) First Year Admission,—<br>*(1) Maharashtra State Candidature Candidates, All India Candidature Candidates, Union Territory of Jammu and Kashmir and Union Territory of Ladakh Migrant Candidature Candidates.—*<br>(*i*) The Candidate should be an Indian National ;<br>(*ii*) The candidate should have passed 10+2 examination and obtained at least 45% marks in aggregate. (Aggregate 40% marks in case of Reserved categories, Economically Weaker Section and |

| | | |
|---|---|---|
| | | Persons with Disability category belonging to Maharashtra State) and obtained non-zero score in CET conducted by the Competent Authority.<br>*(2) Children of NRI/OCI/PIO, Children of Indian workers in the Gulf countries and Foreign National Candidature Candidates.—*<br>(*i*) The candidate should have passed 10+2 examination with at least 45 % marks in aggregate ;<br>(*ii*) Any other criterion declared by appropriate authority from time to time. " |

(2) In Schedule-B,

(*a*) in entry at serial No.1 relating to Post Graduate Degree in Management (Master of Business Administration / Master of Management Studies MBA/MMS), in column (*3*), in clause (*2*), for the sub-clause (*iii*), the following sub-clause shall be substituted, namely :—

" (*iii*) The candidate should have obtained non zero positive score in any one of the following examinations :—

CET conducted by the Competent Authority or Common Admission Test conducted by Indian Institute of Management (CAT) or Common Management Aptitude Test Conducted by National Testing Agency (CMAT) or Xavier Aptitude Test conducted by Xavier School of Management Jamshedpur (XAT) or Entrance Test for Management Admissions conducted by the Association of Indian Management Schools (ATMA) or Management Aptitude Test Conducted by All India Management Association (MAT) or Graduate Management Aptitude Test Conducted by Graduate Management Admission Council, United States of America (GMAT). " ;

(*b*) for entry at serial No. 2, relating to Post Graduate Course in Computer Applications [Master of Computer Application (MCA)], the following entry shall be substituted, namely :—

| | | |
|---|---|---|
| " 2. | Post Graduate Course in Computer Applications [Master of Computer Application (MCA)] | (1) *For Maharashtra State Candidature Candidates, All India Candidature Candidates, Union Territory of Jammu and Kashmir and Union Territory of Ladakh Migrant Candidature Candidates. —*<br>(*i*) The candidate should be an Indian National ;<br>(*ii*) The candidate should have passed B.C.A. or B. Sc. (Computer Science) or B. Sc. (IT) or B.E. (CSE) or B. Tech. (CSE) or B.E. (IT) or B.Tech. (IT) or equivalent Degree and obtained at least 50% marks in aggregate (at least 45% in case of candidates of Reserved categories, Economically Weaker Section and Persons with Disability category belonging to Maharashtra State) ; or<br>(*ii*) The candidate should have passed any graduation degree (*e.g.* : B.E. or B.Tech. or B.Sc or B.Com. or B.A. or B. Voc. etc.,) preferably with Mathematics at 10+2 level or at Graduation level and obtained at least 50% marks in aggregate (at least 45% in case of candidates of Reserved categories, Economically Weaker Section and Persons with Disability category belonging to Maharashtra State) ; |

| | | |
|---|---|---|
| | | (*iii*) The candidate should have obtained non zero positive score in CET.<br>(2) *NRI/OCI/PIO, Children of Indian workers in the Gulf countries and Foreign National Candidature Candidates.—*<br>(*i*) The candidate should have passed B.C.A. or B. Sc. (Computer Science) or B.Sc. (IT) or B.E. (CSE) or B.Tech. (CSE) or B.E. (IT) or B.Tech.(IT) or equivalent Degree and obtained at least 50% marks in aggregate ; or<br>(*i*) The candidate should have passed any graduation degree (*e.g.*: B.E. or B.Tech. or B.Sc. or B.Com. or B.A.or B.Voc.or etc.,) preferably with Mathematics at 10+2 level or at Graduation level and obtained at least 50% marks in aggregate ;<br>(*ii*) Any other criterion declared from time to time by the appropriate authority as defined under the Act. ". |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH TIDKE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.